मौजे. मर्शदपूर तहत कसारी (ता. आष्टी, जि. बीड) येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः पापुयो - २०१६/प्र.क्र.८७/पापु १८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: २८ मार्च, २०१८

वाचा-

१) ग्रामपंचायत मुर्शदपुर तहत कासारी (ता.आष्टी , जि. बीड) यांच ठराव क्र.५, दि. ०१/०५/२०११.
२) अधिक्षक अभियंता,विभागीय भारत निर्माण कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.विआकाऔ/भानिक/तांशा-१/६३९/२०१४, २६/१२/२१४.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे पत्र जा. क्र.ग्रापापुवि/अस्था-२/ कावि.००१८२८/ २०१५. दिनांक ३/०७/२०१५.
४) कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पु वि.जिल्हा परिषद बीड यांचे पत्र क्र.जा.क्र. जिपबी/ ग्रापापुविजिपबी/ तांशा/६०/०००४८८, दि.२२/३/२०१७.

प्रस्तावना:-

मौजे मुर्शदपुर तहत कासारी (ता. आष्टी, जि. बीड) येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रकास संदर्भीय क्र.१ येथील ग्रामसभा ठराव क्र.५ नुसार मुळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तथापी सदर योजनेच्या कामात वाढ झाल्यामुळे तयार करण्यात आलेल्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावातील रु.५,२३,६०,८३८ (निव्वळ) किंमतीच्या अंदाजपत्रकास, अधिक्षक अभियंता, भारत निर्माण कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी संदर्भ क्र. २ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली .त्यानुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, बीड यांनी प्रस्तुत नळ पाणी पुरवठा योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भ क्र. ३ अन्वये शासनास सादर केला होता. तथापि पाणी आरक्षणासाठी भरावी लागणा-या रक्कमेस सुट देण्यात आली असल्यामुळे सुधारीत अंदाजपत्रकातील १२ लक्ष कमी करून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांनी सदंर्भ क्र. ४ अन्वये पुनश्च सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला. तदनुषंगाने प्रस्तुत योजनेच्या आराखडयास व अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मौजे मुर्शदपूर तहत कासारी (ता. आष्टी, जि. बीड) येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या रु. ५,५५,४०,३००/- (ढोबळ) (अक्षरी रुपये पाच कोटी पंचावन लक्ष चाळीस हजार तीनशे फक्त) एवढ्या सुधारीत किंमतीच्या अंदाजपत्रकास पुढील अटींच्या अधिन राहून सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अटी

१. योजनेची चाचणी घेतल्यानंतर योजना संबधीत ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत करून तिचे लेखे बंद करण्यात यावेत..
२. सन २०१३ मधील CAG च्या अहवालानुसार राज्यातील २१% पाणी पुरवठा योजना या देखभालदुरूस्ती अभावी विजदेयके न भरल्यामुळे (Poor maintenance/non payment of electricity bills) बंद पडल्या असल्याचे दिसून येते त्यामुळे सदर योजना आर्थिकदृष्टया सक्षम राहण्यासाठी पाणी पट्टी दरामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ करण्यात यावी.
३. प्रस्तुत योजना कोणत्याही परिस्थितीत पुनर्सुधारीत केली जाणार नाही याची जबाबदारी जिल्हा परिषदेची राहील.
४. या योजनेस मुळ प्रशासकीय मान्यता देताना तसेच सुधारीत मान्यता देताना नमुद केलेल्या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.
५. ही योजना राबविणे, त्याचे परिरक्षण, दुरुस्त्या (विशेष दुरुस्त्या धरुन) या साठी दरवर्षी येणारा आवर्ती खर्च भागविण्यासाठी, योजनेतील घसारा किंवा यंत्रसामुग्री नुतनीकरणासाठी संबंधित ग्रामपंचायतीस/जिल्हा परिषदेस शासनाकडून कोणतीही मदत मिळणार नाही.
६. हगणदारीबाबतच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. या योजनेच्या सुधारित किंमतीतील वाढीव खर्च **रु.५,५५,४०,३०० /- (अक्षरी रुपये पाच कोटी पंचावन लक्ष चाळीस हजार तीनशे फक्त फक्त)** हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमा खालील राज्य हिश्श्यातून /जिल्हा नियोजन मंडळाकडून/किमान गरजा कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणा-या निधीतून करण्यात यावा**.**

३. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या अनुक्रमे अनैपचारिक संदर्भ क्र.१४६/१७/१४४३ दि.२७.११.२०१७ व अनौ. ५९/व्यय-३ दि.१६/२/२०१८ अन्वये प्राप्त त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१५४६२४४६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Sawairam Rathod

Digitally signed by Suresh Sawairam Rathod
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e695ebef4b8a6c860bec48f3ef34f42f0c13f8d1aa06f854d5b9bd6874084124, serialNumber=bcaaf1242528ff3cdece2c8eb03929321c1c09c0a7c4d906e3b8a47677ad9769, cn=Suresh Sawairam Rathod
Date: 2018.03.28 15:48:04 +05'30'

(सु.स. राठोड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधान परिषद.
४) मा. विधानमंडळ सदस्य (सर्व)
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड.
७) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
८) महालेखापाल, लेखापरीक्षा, महाराष्ट्र १, मुंबई
९) संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था(वासो), बेलापूर, नवी मुंबई.
१०) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद
११) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद
१२) संचालक(वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर,नवी मुंबई.
१३) उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद
१४) वरिष्ट भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद
१५) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड
१६) अतिरिक्त मुख्य सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१७) अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१८) प्रधान सचिव, वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१९) मु.अ. तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२०) कार्यासने (पापु-०४, ०६,०७,०९,१०,१३,१७, १९व २०), पा. पु. व स्व. वि.,मंत्रालय,मुंबई-३२
२१) निवड नस्ती कार्यासन पापु-१८.